Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. ११ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६६ । पाने २ ।
DIGITAL EDITION

वीजबिलांवरून शिरपूर फर्स्टचा महावितरण कार्यालयावर ठिय्या

(पान २ वर)



» Selected

### कर्जवसुलीच्या नावाखाली घरात घुसून मारहाणीचा प्रयत्न?

बदलापूर ठाणे :कर्जवसुलीच्या नावाखाली नागरिकांच्या घरात घुसून दमदाटी, दादागिरी आणि जोरजबरदस्तीचे प्रकार वाढत असल्याची गंभीर बाब पुन्हा एकदा समोर आली आहे. बदलापूर पश्चिम परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेत बँकेच्या कथित रिक्व्हरी एजंटने थेट संबंधित व्यक्तीच्या घरात प्रवेश करून दबाव टाकल्याचा आणि मारहाणीचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी आलेल्या एका रिक्व्हरी एजंटने कोणतीही पूर्वसूचना, कायदेशीर नोटीस किंवा न्यायालयाचा आदेश नसताना संबंधित कुटुंबाच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर आक्रमक भूमिका घेत कुटुंबीयांवर दबाव आणल्याचा आरोप करण्यात आला.

## राज्यातील २७ जिल्ह्यांतील केळीखालील १८ हजार १२१ हेक्टरचे नुकसान

# केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

## १० दिवसांत पंचनामे पूर्ण करण्याचे कृषिमंत्र्यांचे आदेश, ड्रोन सर्वेक्षणालाही प्राधान्य

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : मे आणि जून महिन्यात राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या केळी व इतर फळपिकांच्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने दिलासा दिला आहे. बाधित क्षेत्रांचे पंचनामे पुढील १० दिवसांत तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करण्याचे आदेश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.**

शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेत नुकसानभरपाईची प्रक्रिया वेगाने राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मंत्रालयात वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीच्या आढावा बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीला पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले (दूरदृश्य प्रणालीद्वारे), आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल जावळे तसेच कृषी, महसूल आणि विमा कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण



६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र अवकाळी पावसामुळे बाधित झाले असून त्यापैकी तब्बल १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर फळपिकांचे नुकसान झाले असून त्याचे अचूक मूल्यमापन करण्याच्या सूचना कृषिमंत्र्यांनी दिल्या. जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक फटका बसला असून येथे ७ हजार ५९४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील असल्याची नोंद बैठकीत करण्यात आली. याशिवाय बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर फळपिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि महसूल विभागाला समन्वयाने काम करून पंचनाम्यांची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. भारतीय कृषी विमा कंपनीकडूनही बाधित भागांचे सर्वेक्षण सुरू असून सर्व पंचनामे पुढील दहा दिवसांत पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

### विमाविहीन शेतकऱ्यांनाही दिलासा

बैठकीत विमाधारकांसह विमाविहीन शेतकऱ्यांच्या नुकसानीचीही अचूक नोंद घेण्याचे निर्देश देण्यात आले. आवश्यकतेनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे, जेणेकरून नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि जलद होईल. राज्यातील केळी उत्पादकांसह फळबागायतदार शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, पंचनामे वेळेत पूर्ण झाल्यास नुकसानभरपाई लवकर मिळण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## मारुती मंदिरात चोरी; चांदीचा मुकूट व दागिने लंपास

### चोरट्यांनी ६५ हजारांचा ऐवज पळवला

**जन सम्राट टाईम्स**

**पारोळा | प्रतिनिधी:** तालुक्यातील धरणगाव रस्त्यावरील पिंपरखेड येथील प्रसिद्ध मारुती मंदिरात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत मूर्तीवरील चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंदिराचे पूजारी आसाराम त्र्यंबक पाटील (वय ६९, रा. बहादरपूर, ता. पारोळा) यांनी नेहमीप्रमाणे ८ जून २०२६ रोजी मंदिरातील पूजा आणि साफसफाई पूर्ण करून रात्री मंदिराला कुलूप लावले. त्यानंतर ते जवळील राम मंदिर परिसरात झोपण्यासाठी गेले होते. दुसऱ्या दिवशी ९ जून रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास ते पूजा करण्यासाठी मंदिरात आले असता मारुतीच्या मूर्तीवरील चांदीचा मुकूट आणि कानातील चांदीची मासळी गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी गाभाऱ्यात प्रवेश करून दागिने चोरून नेले होते. मात्र, मूर्तीच्या गळ्यातील चांदीचा हार जागेवरच आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पूजारी आसाराम पाटील यांनी मंदिराचे विश्वस्त वासुदेव



सोनार तसेच ग्रामस्थांना कळविले. परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली, मात्र चोरीस गेलेले दागिने सापडले नाहीत. चोरट्यांनी मंदिरातून सुमारे ५०० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकूट (अंदाजे किंमत ५० हजार रुपये) तसेच सुमारे १५० ग्रॅम वजनाची चांदीची मासळी (अंदाजे किंमत १५ हजार रुपये) असा एकूण ६५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

### पोलिसांकडून तपास सुरू

या प्रकरणी पूजारी आसाराम पाटील यांच्या फिर्यादीवरून पारोळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५ अन्वये अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक योगेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल कैलास सुरेश साळुंके आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रविण पाटील करीत आहेत.


## वालधुनीतील बुद्धभूमीच्या जागेवर उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे महाबोधी संकुल

### मंत्री संजय शिरसाठ यांच्या निवासस्थानी मॅरेथॉन बैठकीत ऐतिहासिक निर्णय

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वालधुनी येथील बुद्धभूमीच्या जागेबाबत असलेल्या वादावर अखेर तोडगा निघाला असून, या जागेचा विकास बिहारमधील जागतिक प्रसिद्ध बोधगया येथील महाबोधी संकुलाच्या धर्तीवर करण्यात येणार आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत या ठिकाणी आंतरराष्ट्रीय महाबोधी संकुल” उभारण्याचा तसेच त्यासाठी स्वतंत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे स्थानिक स्तरावर निर्माण झालेल्या सर्व वाद-विवादांवर कायमचा पडदा पडला असून, सामाजिक ऐक्य, प्रज्ञा,



करुणा आणि बंधुतेचा नवा अध्याय सुरू होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी बैठकीला आनंदराज आंबेडकर देखील उपस्थीत होते. वालधुनी येथील बुद्धभूमीच्या जागेसंदर्भात विविध सामाजिक, कायदेशीर आणि तांत्रिक मुद्द्यांवरून निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी विशेष बैठकीचे आयोजन केले होते. तब्बल तीन तास चाललेल्या या बैठकीत संबंधित दोन्ही बाजूंचे प्रतिनिधी, स्थानिक घटक, सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मंत्री शिरसाठ यांनी सर्व संबंधितांचे मत, भावना आणि भूमिका अत्यंत संवेदनशीलतेने ऐकून घेतल्या. “वाद कायम ठेवण्यापेक्षा या जागेचा समाजहितासाठी, राज्यहितासाठी आणि भावी पिढ्यांच्या दृष्टीने सकारात्मक वापर व्हावा,” यावर अखेर सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आले. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी सांगितले की, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या जागेच्या सामाजिक आणि ऐतिहासिक महत्त्वाचा विचार करून येथे भव्य आंतरराष्ट्रीय दर्जाचे बौद्ध संकुल उभारून या प्रश्नावर तोडगा काढावा, असे सुचवले होते. त्यानुसार शासनाने वालधुनी येथील सुमारे ३० एकर जागेवर ‘आंतरराष्ट्रीय महाबोधी संकुल’ उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

## वरणगावात राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन उत्साहात

### वृक्षारोपणातून सामाजिक बांधिलकीचा संदेश

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ,| प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त वरणगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठा मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. वर्धापन दिनाचे औचित्य साधत सामाजिक बांधिलकी जपत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भुसावळ विधानसभा अध्यक्ष दीपक मराठे होते. सकाळी ९ वाजता कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाच्या विचारधारेचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून विकासाभिमुख राजकारण करण्याची ग्वाही देण्यात आली. वर्धापन दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. मराठा मंगल कार्यालय परिसरात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मतही यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला जळगाव जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्षा प्रतिभा तावडे, वरणगाव शहराध्यक्ष प्रा. राहुल जोहरे, गटनेते इरफान सय्यद, नगरसेवक निलेश चौधरी, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष डॉ. आहेसान अहमद, अल्पसंख्यांक तालुका कार्याध्यक्ष जुनेद शाह, समाज माध्यम प्रमुख जिशान खान, शहर उपाध्यक्ष वसीम शेख, अल्पसंख्यांक शहर उपाध्यक्ष शाहरुख खान, जितेंद्र तावडे, विनायक शिवरामे यांच्यासह पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, विविध पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. वर्धापन दिनाचा हा कार्यक्रम राजकीय उपक्रमासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा ठरला.

## पालखी सेवेला शुल्काचा अडसर?

### मंडप परवाना शुल्कात मोठी तफावत

**जन सम्राट टाईम्स**

**पिंपरी | प्रतिनिधी :** संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त उभारण्यात येणाऱ्या मंडपांच्या परवाना शुल्कामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मोठी तफावत असल्याचा गंभीर आरोप भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून सर्व प्रभागांमध्ये मंडप परवान्यासाठी एकसमान शुल्क आकारणी लागू करण्याची मागणी केली आहे. ‘अ’ क्षेत्रात १० रुपये, ‘फ’ क्षेत्रात ५० रुपये; नेमका फरक कशामुळे? काळभोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, महानगरपालिकेच्या ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयात मंडप परवान्यासाठी प्रति चौरस फूट १० रुपये शुल्क आकारले जाते. मात्र, ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयात त्याच प्रकारच्या मंडपासाठी प्रति चौरस फूट ५० रुपये आकारले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. एकाच महानगरपालिका हद्दीत वेगवेगळे दर आकारले जात असल्याने नागरिक, सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून अनेकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पालखी सेवेसाठी उभारल्या जाणाऱ्या मंडपांवर आर्थिक ताण संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त दरवर्षी विविध संस्था, मंडळे आणि स्वयंसेवी संघटनांकडून वारकरी बांधवांसाठी मोफत अन्नदान, वैद्यकीय सेवा, औषध वाटप, चहा-नाश्ता, रेनकोट व छत्री वाटप यांसारखे सेवाभावी उपक्रम राबविले जातात. मात्र, मंडप परवान्याच्या वाढीव शुल्कामुळे अशा




सामाजिक उपक्रमांच्या आयोजनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. खाजगी विकासकांना सवलत, सेवाभावी संस्थांना जादा शुल्क? सचिन काळभोर यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, महापौर मैदानावर भाडेतत्त्वावर खाजगी विकासकांना प्रति चौरस फूट १० रुपये दराने मंडप परवानगी दिली जाते. परंतु, पालखी सोहळ्यासाठी ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाकडून ५० रुपये प्रति चौरस फूट दर आकारला जात असल्याने संस्था, मंडळे आणि सामाजिक कार्यकर्त्यांना वेठीस धरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### समान व वाजवी शुल्काची मागणी

महानगरपालिका हद्दीतील सर्व आठ प्रभागांमध्ये मंडप परवाना शुल्काचा एकसमान व सुसंगत दर निश्चित करावा, अवाजवी शुल्क आकारणी तातडीने रद्द करावी आणि संबंधित प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी सचिन काळभोर यांनी आयुक्तांकडे केली आहे. पालखी सोहळ्यासारख्या धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली? नगरपरिषदेविरोधात प्रथम अपील दाखल

### दिव्यांग निधीच्या माहितीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप साळी यांचा पाठपुरावा!



**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद | प्रतिनिधी :** नशिराबाद नगरपरिषदेच्या कारभारात माहिती अधिकार कायदा, २००५ (RTI) अंतर्गत मागविण्यात आलेली माहिती निर्धारित मुदतीत न दिल्याचा आरोप समोर आला असून, याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप अनिल साळी यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. लेखापरीक्षण अहवाल, मासिक सभेचे ठराव आणि दिव्यांग निधीच्या खर्चासह विविध महत्त्वाच्या बाबींची माहिती वेळेत उपलब्ध करून न दिल्याने नगरपरिषदेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. प्रदीप साळी यांनी २४ एप्रिल २०२६ रोजी माहिती अधिकार कायद्यांतर्गत नशिराबाद नगरपरिषदेच्या प्रशासन विभागाकडे अधिकृत अर्ज सादर करून सन २०२१ ते २०२६ या कालावधीतील लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल, संबंधित शासकीय लेखा परीक्षकांचा पॅनेल क्रमांक, जानेवारी ते एप्रिल २०२६ दरम्यान झालेल्या मासिक सभांचे ठराव, तसेच दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधीचा खर्च आणि कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भातील माहिती मागितली होती. मात्र, कायद्यानुसार ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही अंतिम मुदत संपल्यानंतरही कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप साळी यांनी केला आहे. संबंधित माहिती न मिळाल्याने त्यांनी ५ जून २०२६ रोजी प्रपत्र ‘ब’ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद नशिराबाद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना प्रदीप साळी यांनी सांगितले की, माहिती अधिकार कायद्याचा उद्देश शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे हा आहे. मात्र, नगरपरिषद प्रशासनाने वेळेत माहिती न देता कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केले असून, संबंधित माहिती आता विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

प्रथम अपिलातही न्याय न मिळाल्यास राज्य माहिती आयोगाकडे दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला.

नशिराबाद नगरपरिषदेच्या कारभारात माहिती अधिकार कायदा, २००५ (RTI) अंतर्गत मागविण्यात आलेली माहिती निर्धारित मुदतीत न दिल्याचा आरोप समोर आला असून, याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप अनिल साळी यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. लेखापरीक्षण अहवाल, मासिक सभेचे ठराव आणि दिव्यांग निधीच्या खर्चासह विविध महत्त्वाच्या बाबींची माहिती वेळेत उपलब्ध करून न दिल्याने नगरपरिषदेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### ऑडिट अहवालावर नागरिकांचे लक्ष

नगरपरिषदेकडील दिव्यांगांसाठी राखीव निधी नेमका कुठे खर्च करण्यात आला, लेखापरीक्षण अहवालात कोणत्या त्रुटी नमूद आहेत आणि मासिक सभांमध्ये कोणते निर्णय घेण्यात आले, याबाबतची माहिती सार्वजनिक होणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. ही माहिती देण्यास होणारा विलंब संशय निर्माण करणारा असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. दरम्यान, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून या प्रकरणावर काय निर्णय घेतला जातो आणि संबंधित माहिती अर्जदाराला उपलब्ध करून दिली जाते का, याकडे नशिराबादकरांचे लक्ष लागले आहे.

# जळगावच्या केळी उत्पादकांना दिलासा देण्याच्या हालचालींना वेग!

## नुकसानभरपाई प्रक्रिया गतीमान करण्यावर भर

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/पाळधी/जळगाव प्रतिनिधी:** मे आणि जून २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय (दत्ता मामा) भरणे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली.

जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारामुळे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी महत्त्वपूर्ण निर्णयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत पालकमंत्री गुलाबराव पाटील, मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील आणि रावेरचे आमदार अमोल जावळे यांनी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध अडचणी व मागण्या ठामपणे मांडल्या. यानंतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी



वादळी वाऱ्यामुळे बाधित झालेल्या फळपिकांचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची खबरदारी घेण्याबरोबरच नुकसानभरपाईची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी महसूल विभाग, कृषी विभाग आणि विमा कंपन्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, जळगाव जिल्ह्यात २३ मे ते ६ जून २०२६ या कालावधीत झालेल्या वादळी वाऱ्यामुळे ४१३ गावांतील तब्बल १० हजार ३६९ शेतकरी बाधित झाले असून सुमारे ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये रावेर तालुक्यातील सुमारे ३ हजार ७७१ हेक्टर, मुक्ताईनगर तालुक्यातील १ हजार ५४९ हेक्टर आणि चोपडा तालुक्यातील ८८५ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. विशेषतः रावेर आणि मुक्ताईनगर तालुक्यातील केळी बागांना सर्वाधिक फटका बसल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या वतीने अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. विमा कंपन्यांकडून कमी क्षेत्र दाखविण्याच्या तक्रारी, पूर्वसूचना नोंदणीतील तांत्रिक अडचणी, एमआरएसएसी अहवालामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव आणि केळी उत्पादकांना विशेष आर्थिक मदत देण्याची गरज त्यांनी बैठकीत मांडली. मध्यप्रदेश शासनाच्या धर्तीवर नुकसानग्रस्त केळी उत्पादकांना हेक्टरी दोन लाख रुपयांची विशेष मदत देण्याची मागणीही त्यांनी केली. या मागणीवर सकारात्मक भूमिका घेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच विमा कंपन्यांनी प्रत्यक्ष पंचनामे आणि वस्तुस्थितीच्या आधारे दावे निकाली काढावेत, अपील केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करावी आणि नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण पुढील दहा दिवसांत पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीला फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग नोंदविला. तसेच कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव परिमल सिंग, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, कृषी संचालक (विस्तार) रफिक नाईकवाडी, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी, भारतीय कृषी विमा कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, विविध विमा कंपन्यांचे प्रतिनिधी आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य

बैठकीच्या समारोपावेळी कृषिमंत्री भरणे यांनी “शेतकरी हा शासनाच्या कामकाजाचा केंद्रबिंदू असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत न्याय आणि आर्थिक मदत मिळणे ही सर्व यंत्रणांची जबाबदारी आहे,” असे स्पष्ट करत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली असून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्याच्या प्रश्नांना राज्य शासनाच्या सर्वोच्च स्तरावर प्राधान्य मिळाल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# विहजरत शमशुद्दीनशाह बाबा दर्ग्याचा उर्स धार्मिक उत्साहात!

## विध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी :** कॅम्प परिसरातील बॉम्बे गॅरेजजवळ असलेल्या हजरत शमशुद्दीनशाह बाबा रहे दर्ग्याचा उर्स शरीफ विविध धार्मिक कार्यक्रम आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. उर्सनिमित्त दर्गा परिसरात मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावत दर्शन घेतले. विशेष म्हणजे, या सोहळ्यात हिंदू-मुस्लिमसह सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी सहभागी होत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडवले. गेल्या २२ वर्षांपासून उर्स कमिटीचे अध्यक्ष दिनेश परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक उत्सव सातत्याने आयोजित केला जात असून, परिसरातील नागरिकांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यंदाही विविध धार्मिक विधी, प्रार्थना आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उर्स सोहळा भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. उत्सवानिमित्त दर्गा परिसर आकर्षक विद्युत रोषणाई आणि रंगीबेरंगी फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्ग्यात हजेरी लावली. उपस्थित नागरिक आणि भाविकांसाठी विशेष लंगर (महाप्रसाद) आयोजित करण्यात आला होता. हजारो भाविकांनी लंगराचा लाभ घेत धार्मिक आणि सामाजिक ऐक्याचा संदेश अनुभवला. या प्रसंगी उर्स कमिटीचे उपाध्यक्ष दिनेश अर्दाळकर, विजय सोनवणे, अल्फात सय्यद, महेश गुंडाली, उमेश परदेशी, दीपक म्हस्के, रोहन गवांडे, रीना अडागळे, समीर सय्यद यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उर्स सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी उर्स कमिटीच्या पदाधिकारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. धार्मिक परंपरा जपत समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सौहार्दाचा संदेश देणारा हा सोहळा परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. उर्सनिमित्त दर्गा परिसरात मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावत दर्शन घेतले. विशेष म्हणजे, या सोहळ्यात हिंदू-मुस्लिमसह सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी सहभागी होत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडवले.


जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ब्राम्हणपुरीत चोरांचा धुमाकूळ; परिसरात भीतीचे वातावरण!

## घरफोडीनंतर ग्रामस्थांमध्ये संताप

जन सम्राट टाईम्स

**रोटवद । प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील ब्राम्हणपुरी परिसरात भुरट्या चोरांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घालत एका घरात लाखो रुपयांची घरफोडी केल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात चोरट्यांनी घरातील रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारल्याने परिसरात भीती आणि अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घरातील सदस्य काही कामानिमित्त बाहेर गेले असताना चोरट्यांनी संधी साधून घराचे कुलूप तोडत आत प्रवेश केला. घरातील कपाटे आणि सामानाची उचकापाचक करत त्यांनी रोख रक्कम, दागदागिने आणि इतर मौल्यवान वस्तू लंपास केल्या. चोरीची घटना उघडकीस येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली आणि संताप व्यक्त केला. या घटनेनंतर ब्राम्हणपुरीसह परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत चिंता वाढली असून, रात्रीच्या वेळी नियमित आणि प्रभावी पोलीस गस्त वाढविण्याची मागणी जोर धरू लागली आहे. गेल्या काही काळात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचा दावा करत ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही



प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्रामस्थांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून अज्ञात चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, तसेच गावात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे आणि नियमित गस्त घालणे यासारख्या उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

### पोलीस गस्त वाढविण्याची मागणी

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, "परिसरातील वाढत्या चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर आणि प्रभावी पावले उचलली नाहीत, तर नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल," असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

# कोळदा–नंदुरबार रस्ता काँक्रीटीकरणासाठी हजारो झाडांची कत्तल?; पर्यावरणप्रेमींकडून तीव्र संताप!

## रुंदीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याचा आरोप; प्रशासनाने परवानग्या

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील कोळदा ते नंदुरबार मार्गावरील सुरू असलेल्या काँक्रीटीकरण आणि रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी केला असून, या प्रकरणामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकासकामांच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी दिला जात असल्याचा आरोप करत प्रशासनाने संपूर्ण प्रक्रियेबाबत पारदर्शक माहिती जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. एकीकडे शासन "झाडे लावा, झाडे जगवा" यांसारख्या अभियानांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असताना, दुसरीकडे रस्त्याच्या कामासाठी अनेक वर्षांपासून उभी असलेली हजारो झाडे तोडली जात असल्याचे चित्र समोर येत असल्याने पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची तसेच स्थानिक जैवविविधतेवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, रस्ता रुंदीकरणासाठी मार्गालगतची अनेक मोठी व जुन्या वृक्षांची तोड करण्यात आली आहे. उन्हाळ्यात प्रवाशांना सावली देणारी, पक्षी व लहान वन्यजीवांचे आश्रयस्थान ठरणारी ही झाडे एका मागोमाग एक नष्ट होत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. पर्यावरण कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, शासनाच्या नियमांनुसार एका झाडाच्या तोडीच्या बदल्यात अनेक



झाडांची लागवड करणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात पर्यायी वृक्षारोपण किंवा पुनर्लागवडीची प्रभावी व्यवस्था दिसून येत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे रस्त्याच्या विकासासोबत पर्यावरण संवर्धनालाही समान प्राधान्य दिले जावे, अशी मागणी होत आहे. यासंदर्भात संबंधित विभागाने किती झाडे तोडण्यात आली, वृक्षतोडीसाठी कोणत्या प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली, पर्यावरणीय मंजुरीची प्रक्रिया कशी पूर्ण करण्यात आली आणि बदल्यात किती झाडे व कोणत्या ठिकाणी लावली जाणार आहेत, याची सविस्तर माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून करण्यात आली आहे. वाढते तापमान, बदलते हवामान आणि अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. विकासकामे आवश्यक असली तरी ती पर्यावरणपूरक पद्धतीने राबविणे ही काळाची गरज असल्याचे मतही अनेक नागरिकांनी व्यक्त केले. "रस्ते विकासासाठी असतात; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाची अपरिमित हानी करणे कितपत योग्य?" असा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, वृक्षतोडीबाबत पारदर्शक माहिती जाहीर करावी आणि व्यापक वृक्षारोपण मोहीम तातडीने राबवावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# रिंगणगाव ग्रामपंचायत प्रशासकाविना? चार-पाच महिन्यांनंतरही कारभारावर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल । प्रतिनिधी :** रिंगणगाव ग्रामपंचायतीची मुदत संपून जवळपास चार ते पाच महिने उलटून गेल्यानंतरही गावातील प्रशासनिक व्यवस्थेबाबत संभ्रमाचे वातावरण कायम असून, प्रशासक नियुक्ती आणि ग्रामसेवकांच्या कार्यपद्धतीवरून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गावातील मूलभूत सुविधा विस्कळीत झाल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर अद्याप प्रभावी प्रशासन उभे राहिलेले नाही. अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे ग्रामसेवक नियमितपणे गावाकडे लक्ष देत नसल्याने अनेक नागरी प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे एरंडोल पंचायत समितीच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सध्या गावात पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर बनली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. याशिवाय गावातील अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याने अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळा तोंडावर असतानाही स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामपंचायतीचा कारभार प्रभावीपणे सुरू नसल्यामुळे विकासकामेही रखडली असून, प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे गावात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर अत्यावश्यक सेवांचा कारभार सुरळीत चालावा यासाठी तत्कालीन सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणीही ग्रामस्थांकडून पुढे आली आहे. भानुदास मते यासंदर्भात तत्कालीन सरपंच भानुदास मते यांनी सांगितले की, "ग्रामपंचायतीची मुदत संपून चार ते पाच महिने झाले आहेत. मात्र अद्याप प्रशासक नियुक्तीबाबत कोणतेही अधिकृत पत्र मिळालेले नाही. अतिरिक्त ग्रामसेवकाकडूनही अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याने गावात स्वच्छता आणि पाणीटंचाईच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून मी स्वतःच्या खर्चातून गावातील पाणीगळती (लिकेज) दुरुस्त करण्याचे काम करत आहे.

# वीजबिलांवरून शिरपूर फर्स्टचा महावितरण कार्यालयावर ठिय्या

## अपुऱ्या वीजपुरवठ्याविरोधात संताप

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर | प्रतिनिधी :** अवाजवी वीजबिले, अपुरा वीजपुरवठा आणि महावितरणच्या कथित गलथान कारभाराविरोधात शिरपूर फर्स्टच्या वतीने आज शिरपूर येथील महावितरण (एमएसईबी) कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. शहरातील नागरिक, व्यापारी आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

गेल्या काही दिवसांपासून शिरपूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्यक्ष वापराच्या तुलनेत अवाजवी वीजबिले येत असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. अनेक ग्राहकांना अत्यल्प वापर असूनही हजारो रुपयांची बिले आकारण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यामुळे सर्वसामान्य ग्राहक आर्थिक अडचणीत सापडत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. दुसरीकडे, शेतकऱ्यांना शेतीपंपांसाठी नियमानुसार किमान आठ तास वीजपुरवठा मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी वेळ वीज उपलब्ध होत असल्याचा आरोप करण्यात आला. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे सिंचनावर परिणाम होत असून शेतीची कामे खोळंबत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. या सर्व प्रश्नांकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिरपूर फर्स्टच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात



आले. आंदोलनादरम्यान महावितरण कार्यालयात नागरिकांच्या वीजबिल आणि वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी स्वतंत्र ‘हेल्प डेस्क’ सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनाचे विशेष आकर्षण म्हणजे नागरिकांना आलेल्या वीजबिलांचे तोरण तयार करून ते महावितरण कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आले. या अनोख्या पद्धतीने आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवत ग्राहकांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी शहरातील नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच तालुक्यातील विविध भागांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवाजवी वीजबिलांचा प्रश्न आणि अपुऱ्या वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवावी, अन्यथा आगामी काळात आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिरपूर फर्स्टच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे. या आंदोलनामुळे शिरपूर तालुक्यातील वीजपुरवठा आणि बिलिंग व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, महावितरण प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# घाटली ग्रुप ग्रामपंचायतीत कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

## १२ पाड्यांतील विकासकामे कागदावरच झाल्याचा ग्रामस्थांचा दावा

जन सम्राट टाईम्स

**शहादा । प्रतिनिधी:** नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील दुर्गम घाटली ग्रुप ग्रामपंचायतीतील विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या तब्बल १२ पाड्यांमधील विविध विकासकामे केवळ कागदोपत्री पूर्ण दाखवून शासकीय निधीचा अपहार करण्यात आल्याचा दावा करत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे उच्चस्तरीय



चौकशीची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी धडगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे (बीडीओ) लेखी तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे अखेर त्यांनी जिल्हास्तरावर दाद मागत प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला असून, या कालावधीत कारवाई न झाल्यास नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्याचा इशाराही दिला आहे. घाटली ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, वीज, स्वच्छता आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी शासनाकडून दरवर्षी लाखो ते कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो. मात्र, संबंधित विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, ग्रामसेवक आणि सरपंच यांनी प्रत्यक्ष कामे न करता ती कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून बिले काढल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी विकासकामांचे फलक उभारण्यात आले असले तरी प्रत्यक्षात कामे अपूर्ण आहेत किंवा निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत. काही ठिकाणी तर कामांचा मागमूसही नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे "शासनाचा निधी गेला कुठे?" असा संतप्त सवाल आदिवासी बांधवांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात ग्रामस्थांनी प्रशासनासमोर पाच प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. मागील पाच वर्षांतील सर्व विकासकामांचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करणे, प्रत्यक्ष स्थळांची पाहणी करून कामांची पडताळणी करणे, दर्जाची तपासणी करणे, निविदा प्रक्रिया, मोजमाप पुस्तिका, बिले आणि व्हाउचर यांची सखोल चौकशी करणे तसेच गैरव्यवहार सिद्ध झाल्यास संबंधित विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, सरपंच, ग्रामसेवक आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून शासकीय निधीची वसुली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### 15 दिवसांचा अल्टिमेटम; अन्यथा उपोषण

तक्रारीनंतरही स्थानिक पातळीवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला असून त्यांनी प्रशासनाला १५ दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत दोषींवर कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर तीव्र उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला आहे.